# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com

**डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५**


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७ ५८

दिनांक :- 27 JAN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

शासकीय/अनुदानित विनाअनुदानित तंत्रनिकेनते/औषधनिर्माणशास्त्र

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- महाविद्यालयातील अनधिकृत वाहनतळ बंद करणे बाबत..**

संदर्भ :- १.श्री.राहुल रामचंद्र नरोटे, शहर जिल्हा अध्यक्ष भाजपा विद्यार्थी आघाडी, संभाजी नगर, यांचे दिनांक ०४/०१/२०१७ रोजीचे निवेदन.

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयात शहरातील व ग्रामिण भागातील गरिब विद्यार्थ्यी हे महाविद्यालयातून शिक्षण घेतात, वसतिगृहात राहतात. महाविद्यालयात येण्या जाण्या साठी सायकल, मोटार सायकल इत्यादी वाहनाचा वापर विद्यार्थी करीत असतात. अशा विद्यार्थ्याकडून संस्थेतील अनाधिकृत वाहनतळाचे भाडे म्हणून वर दरमहा रु.६००/- ते १०००/- रुपये प्रमाणे शुल्क घेतले जातात. जे कुठल्याही नियमात नसून त्यांना महानगर पालिका, किंवा सक्षम अधिकारी यांची मान्यता न घेता वाहनतळ चालविले जात असल्यासचे श्री.राहुल रामचंद्र नरोटे, शहर जिल्हा अध्यक्ष भाजपा विद्यार्थी आघाडी, संभाजी नगर, यांनी निवेदनात नमुद केलेले आहे.

या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, या बाबत अधिकृत एजन्सी कडून वाहनतळ सुविधा अभ्यागतांसाठी अत्यल्प दराने देण्यात यावी व आपल्याच संस्थेतील विद्यार्थ्यांना निशुल्क देणे अपेक्षित असुन त्यासंबधीचा अहवाल या कर्यालयास सादर करण्यात यावा.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. .श्री.राहुल रामचंद्र नरोटे, शहर जिल्हा अध्यक्ष भाजपा विद्यार्थी आघाडी, अंबिका नगर, प्लॉट नं.७, सिडको एन-२,संभाजी नगर, यांना माहितीस्तव

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.